वसंतराव नाईक, मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय लातूर येथील भूसंपादन प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार न्यायालयात जमा करण्याकरीता ८६७४- शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी-१०१- शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी (अ) न्यायालयाकडे जमा केलेल्या प्रतिभूती रकमा या लेखाशिर्षाखाली रू.५,७३,१३,०५० इतकी रक्कम वितरीत करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक न्यायप्र१६१५/प्र.क्र.१५८/७अे
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक - ४/०१/२०१६

संदर्भ- वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे क्र.अेअे-२/कअ/भूसं/२०१५ दिनांक १४/१२/२०१५ चे पत्र

प्रस्तावना-

वसंतराव नाईक, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी महाविद्यालय स्थापन करण्यासाठी सन १९९३ मध्ये संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा खरेदी दर वाढवून मिळण्यासाठी संबंधीत जमीन मालकांनी सन १९९४ मध्ये लातूर दिवाणी न्यायालय येथे २१ दिवाणी प्रकरणे दाखल केली होती. या प्रकरणांमध्ये दिवाणी न्यायालयाने दि.१९.०७.२०१० रोजीच्या निर्णयान्वये जमीन मालकांना वाढीव मावेजा देणेबाबत निवाडा दिला आहे. या न्यायनिर्णयाच्या विरुध्द वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे अपील क्र.२४८६/२०१० दाखल केले होते. सदर खंडपीठाने अपील दाखल करतेवेळी दिवाणी न्यायालय, लातूर यांच्या न्यायनिर्णयानुसार प्रथम वाढीव मावेजाच्या ५०% रक्कम न्यायालयात जमा करावी असे आदेश दिल्याने एकूण सात प्रकरणी रु.२६,२४,७८,५२१/- इतकी रक्कम दि.२.७.२०११ च्या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आली असून ती न्यायालयात जमा करण्यात आली आहे.

सदर प्रकरणांपैकी श्रीमती जाहेदाबी बेगम बशीर अहमद या वादीने १००% वाढीव मावेजा मिळणेबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील अर्ज क्र.२५८५/२०१४ अन्वये अपील दाखल केले. सदर अपील उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी फेटाळल्याने सदर वादीने मा.सर्वोच्च न्यायालयात एसएलपी क्र.२२२५१/१४ दाखल केले होते. सदर एसएलपीच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१३.४.२०१५ रोजी ५०% रक्कम जिल्हाधिकाऱ्यांच्या सहमतीने हमीसह व उर्वरित ५०% रक्कम हमीशिवाय काढण्याबाबत निर्णय दिला आहे. या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल सिव्हील अर्ज क्र.६६४३/२०१५, प्रथम अपील क्र.२४८६/२०१० मध्ये दि.१९.६.२०१५ रोजी उर्वरित ५०% रक्कम तीन आठवडयाच्या आत जमा करण्याचे निदेश दिले असल्याने श्रीमती जाहेदाबी बेगम बशीर अहमद यांचे प्रकरणी भूसंपादन अधिकारी यांनी वाढीव मावेजाची रु.११,४६,२६,१०१/- इतकी रक्कम निश्चित केली आहे.

मा.उच्च न्यायालयाने दि.१९.६.२०१५ आदेशानुसार सदर रकमेच्या ५०% रक्कम म्हणजेच रु.५,७६,१३,०५१/- यापूर्वीच मा.न्यायालयात जमा करण्यात आली असल्याने उर्वरित ५०% रक्कम रु.५,७३,१३,०५०/- मा.न्यायालयात जमा करण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी श्रीमती जाहेदाबी बेगम बशीर अहमद यांचे प्रकरणी दिलेल्या आदेशानुसार मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रु.५,७३,१३,०५०/- इतकी अनामत रक्कम खालील अटींसह कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना वितरीत करण्यात येत आहे.

अटी-

अ) सदर न्यायालयीन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाकडून मुदत वाढवून घ्यावी.

आ) सदर न्यायालयीन प्रकरणी विद्यापीठाने शासनाची बाजू भक्कमपणे मांडून घेऊन शासनाच्या बाजुने निकाल लागण्यास व मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे प्रदान केलली व जमा केलेली सदर रक्कम शासनाच्या तिजोरीत विहीत लेखाशीर्षाखाली जमा होईल हे पहावे. याद्वारे उपलब्ध करुन दिलेली सदर रक्कम प्रतिवादींनी परस्पर काढून घेऊ नये याबाबतची काळजी वसंतराव नाईक, मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कुलसचिव यांनी घ्यावी. शासन मान्यतेशिवाय निधी अदा करण्यासंबंधी कोणतीही संमती न्यायालयात देण्यात येऊ नये. निधी जमा झाल्याने न्यायालयीन प्रकरणात बिनशर्त स्थगिती आदेश प्राप्त होतील याची काळजी स्वत: कुलसचिव यांनी घ्यावी.

इ) प्रस्तुत प्रकरणाचा पाठपुरावा न्यायालयात करण्याची व वेळोवेळी शासनास अहवाल सादर करण्याबाबतची जबाबदारी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कुलसचिव यांची राहील.

ई) सदर प्रकरणात भूसंपादन अधिनियमातील तरतुदी तसेच अनुषंगिक न्यायनिर्णय विचारात घेऊन सरकारी वकीलामार्फत शासनाची बाजू मा.न्यायालयापुढे मांडण्याची जबाबदारी कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांची राहील.

२. याबाबतीत होणारा खर्च हा “८६७४- शासनाने ठेवलेल्या प्रतिभूत ठेवी -१०१ शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी (अ) न्यायालयाकडे जमा केलेल्या प्रतिभूती रकमा” या लेखाशीर्षाखालील चालू वर्षाच्या अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा. सदर रक्कम कोषागारातून आहरित करण्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

३. शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक सीएनएफ १०८३/१४०/अर्थसंकल्प-३ दि.२६.४.१९८३ व शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक : सीएनएफ-१०८३/१५३/अर्थसंकल्प-३ दि.२८.८.१९८६ अन्वये दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

४. या प्रकरणी महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ मधील नियम आणि लेखासंहिता १९९१ मधील तरतुदीच्या तसेच प्रचलित शासन आदेश तसेच कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या व्यय कार्यासनाच्या अनौपचारीक संदर्भ व्यय १ च्या दि.२८/७/२०१५ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ १५४/अर्थ २ दि.२७/७/२०१५ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०५११३३०८०३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने

Kamlakar Yeshvant Vanjare

Digitally signed by Kamlakar Yeshvant Vanjare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=AGRICULTURE AND ADF DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c08eef62183520696d2005b153b8cc2a552337a23fc4d457a4434216d9324c3b, serialNumber=6fd0ddfb9412fda09432e5f8a3e140c065770ba4ca63ef6fc5ba354810e2828b, cn=Kamlakar Yeshvant Vanjare
Date: 2016.01.05 11:35:43 +05'30'

(क.य.वंजारे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक,वसंतराव नाईक मराठवाडा, कृषि विद्यापीठ, परभणी
२) जिल्हाधिकारी/जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर/परभणी
३) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन समन्वय), जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर
४) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर
५) सरकारी वकील, मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद
६) महालोखापाल, महाराष्ट्र१/२(लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
७) वित्त विभाग(अर्थसंकल्प शाखा/व्यय शाखा), मंत्रालय, मुंबई-३२
८) कार्यासन ८अे/२अे कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२